शासनाच्या विविध योजने अंतर्गत नोंद झालेल्या सापळा गुन्हंयाची योजनानिहाय प्रकरणांची माहिती.

## इतर योजना

| अ.क्र. | परिक्षेत्राचे नाव व गुरनं व मुख्यालय सिआर क्रमांक | लोकसेवकाचे नांव, हुदद् व खाते | वर्ग | लाचेची रक्कम | कल्याणकारी योजनेचे नांव | गुन्हयाची थोडक्यात हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे परिक्षेत्र, ठाणे अॅ.क.ब्युरो, मोखाडा पोलीस ठाणे गुन्हा नों.क्र. ०१/२०२० भ्र.प्र.का.(संशोधन २०१८) कलम ७ दिनांक-०४/०१/२०२० | गजानन मुख्त्यारसिंग इंगळे, वय ४२ वर्षे, सहायक कृषी अधिकारी, कृषी विभाग मोखाडा, जिल्हा पालघर (कृषी विभाग) (सीआर/०७/ठाणे/२०२०) | ३ | २,५००/- रुपये | उन्नत शेती समृध्द शेतकरी योजना | फिर्यादी यांच्या आईच्या नावे 'उन्नत शेती समृध्द शेतकरी' या योजनेअंतर्गत मंजुर झालेली सबसीडी रक्कम फिर्यादी यांच्या आईच्या खात्यावर जमा करण्यासाठी आलोसे यांनी ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २,५००/-रुपयांची लाच स्विकारली. |
| २ | नांदेड परिक्षेत्र, हिंगोली अॅ.क. ब्युरो, पो.स्टे.हिंगोली शहर, गुरनं ६०६/२०१९, कलम ७ भ्र.प्र. अधिनियम (संशोधन)२०१८ दिनांक-२६/१०/२०१९ | संदीपकुमार सुभाषराव राठोड, वय ३३ वर्षे, व्यवसाय-नौकरी, समुह सहाय्यक (कंत्राटी) नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय, पलटन हिंगोली ह.मु. सुराणा नगर, हिंगोली कृषी विभाग (कंत्राटी) (सीआर/७१४/हिंगोली/२०१९) | ईलोसे | ३०००/- रुपये | नानाजी देशमुख योजना | तक्रारदार यांचे पत्नीचे नावे नानाजी देशमुख योजनेचा ईलेक्ट्रीक मोटर मिळणेसाठीचा फॉर्म भरुन दिल्याचा मोबदला व ईलेक्ट्रीक मोटारचे १५,०००/-रुपयांचे अनुदान मंजुर करुन दिल्याचा मोबदला म्हणुन आलोसे यांनी ३,०००/-रुपये लाचेची मागणी करून ती स्विकारली. |
| ३ | पुणे परिक्षेत्र, सांगली अॅ.क.ब्युरो, भिलवडी पोलीस ठाणे, सांगली, गु. र.नं. ११७/२०२०, भ्र.प्रति.अधि कलम ७ दिनांक-११/०९/२०२० | राजेंद्र दिनकर पाटील,वय ४९ वर्षे, ग्रामविकास अधिकारी, भिलवडी ग्रामपंचायत, वर्ग ३ (पंचायत समीती विभाग) (सीआर/४२९/सांगली/२०२०) | ३ | १२,०००/- रुपये. | जनसुविधा योजना | फिर्यादी यांनी जनसुविधा योजनेंतर्गत केलेल्या स्मशान भुमीच्या कामाचा ४,००,०००/- रु. बिलाचा चेक काढण्यासाठी ३ टक्के प्रमाणे १२,०००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ४ | औरंगाबाद परिक्षेत्र, बीड अॅ.क. ब्युरो, पो.स्टे शिवाजीनगर गुरनं. ४६१/२०२० कलम ७, भ्र.प्र.का. १९८८ दिनांक-०६/१२/२०२० | श्री.नामदेव रामकिसन बहीर, वय ५५ वर्षे, धंदा नौकरी, प्रभारी उप अभियंता, जिल्हा परीषद बांधकाम विभाग, उप विभाग, माजलगाव जि.बीड रा.संत तुकाराम नगर राजीव गांधी चौक, बीड (जिल्हा परिषद विभाग) (सीआर/५७२/बीड/२०२०) | २ | ८०००/- | डॉ.आंबेडकर सामाजिक विकास योजना | फिर्यादी यांनी भारतरत्न बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना अंतर्गत केलेल्या स्मशानभुमी सौंदर्यकरण करणाचे कामाचे बील उर्वरीत ६० टक्के रक्कम मिळण्यासाठीचे एम.बी रेकॉर्डवर व बिलावर सही करण्यासाठी जिल्हा परिषद बांधकाम विभाग माजलगाव प्रभारी उपअभियंता श्री. बहिर यांनी १२०००/- रफपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती ८०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली. |
| ५ | पुणे परिक्षेत्र, सातारा अॅ.क.ब्युरो., वडुज पोलीस ठाणे, सातारा गु.र.नं. १७४/२०२१, भ्र.प्रति.अधि क ७ दि. १७/०६/२०२१ | रविकांत नारायण लोहारा वय ४६ वर्षे, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती खटाव,जि सातारा (जिल्हा परिषद विभाग) (सीआर/३६०/सातारा/२०२१) | ३ | ८,०००/- रुपये | मागासवर्गीय लाभार्थी | फिर्यादी मागासवर्गीय लाभार्थी असुन त्यांना जिल्हा परिषद मधील (२० टक्के मधुन वस्तु खरेदी करणेसाठी मदत पुरवणे) या योजणेअंतर्गत फिर्यादीस उसाचे रस यंत्र खरेदी करणेस मिळालेल्या पैशांच्या मोबदल्यात म्हणुन नमुद आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे ८५००/- रुपयांची लाच मागणी करुन तडजोडी अंती ८०००/- रुपये स्विकारले. |
| ६ | अमरावती परिक्षेत्र, अमरावती अॅ. क. ब्युरो.,पो.स्टे.अंजनगांव सुर्जी, अमरावती ग्रामीण अप.नं. ४५८/२०२१, कलम ७,१२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ दिनांक - १०/०६/२०२१ | १) हरीष सुभाषराव काळे, वय ३१ वर्षे, पद : अव्वल कारकून, नेमणूक : अन्न पुरवठा विभाग, तहसिल कार्यालय, अंजनगांव सुर्जी, जि. अमरावती (महसुल विभाग) (सीआर/३४१/अमरावती/२०२१) | ३ | २,५००/- रुपये | पंतप्रधान गरीब योजना | फिर्यादी यांचे आईच्या नावाने सरकारी स्वस्त धान्य दुकान असून पंतप्रधान गरीब कल्याण योजने अंतर्गत जून २०२० ते सप्टेंबर २०२० अशा ४ महिन्याचे ३६,००० रुपये जमा झालेल्या रकमेच्या १० टक्के प्रमाणे ३,६०० रुपये लाचेची मागणी नमुद आलोसे क्र. १ यांनी फिर्यादी यांचेकडे करुन तडजोडीअंती २,५०० रुपये लाच रक्कम खाजगी इसमामार्फत स्विकारली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ठाणे परिक्षेत्र, पालघर अ‍ॅ.क.ब्युरो., मनोर पोलीस ठाणे गुन्हा नों.क्र. १३६/२०२१ भ्रप्रका (संशोधन २०१८)कलम ७<br>दिनांक - १४/०७/२०२१ | १) श्रीमती प्रेमा नथु रावते, वय ३३ वर्षे, सरपंच<br>(महसुल विभाग)<br>(सीआर/४२३/पालघर/२०२१) | ईलोसे | १३,०००/- रुपये | पेसा योजना | फिर्यादी या ग्रुप ग्रामपंचायत कार्यालय केव येथील ग्रामपंचायत सदस्य असुन यांचे वॉर्डमध्ये वित्त आयोगाअंतर्गत तसेच पेसा योजनेअंतर्गत मंजुर झालेली रस्ता कॉंक्रीटीकरणाची कामे फिर्यादी यांनी त्यांच्या ठेकेदारामार्फत पुर्ण केले होते. त्याचे एकुण ३,००,०००/-रुपयांचे बिल मंजुर झाले होते. सदर बिलापैकी २,६०,०००/-रुपये प्राप्त झाले आहेत. बिलाची उर्वरीत रक्कम ४०,०००/-रुपये मंजुर होण्यासाठी वरील नमुद इलोसे क्र. १ यांनी शिल्लक असलेले बिल मंजुर करुन चेक देण्याकरीता स्वत:करीता १०,०००/-रु. व आलोसे क्र. २ यांचेकरीता ५,०००/-रु. असे एकुण १५,०००/-रु लाचेची मागणी करुन इलोसे क्र.१ यांनी ९,०००/-रुपये स्विकारले तसेच आलोसे क. २ यांचे मार्फतीने इलोसे क्र.३ यांनी ४०००/-रुपये स्विकारले. |
| ८ | नाशिक परिक्षेत्र, जळगांव, अ‍ॅ.क. ब्युरो., जिल्हापेठ पोस्टे,जि. जळगांव, गुरनं. २३९/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन १९८८ (संशोधन) कायदा २०१८ चे कलम ७, प्रमाणे<br>दि.-१५/०६/२१ | आनंद देविदास विद्यागर, वय ५०, प्रकल्प अधिकारी, महाराष्ट्र उद्योजगता विकास केंद्र, जळगंव<br>(जिल्हा उद्योग विभाग)<br>(सीआर/३५१/जळगांव/२०२१) | ३ | १०,०००/- रुपये | पीएमईजीपी | फिर्यादी यांनी नवीन वॉटर प्लॅन्ट टाकण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र जळगांव येथे प्रस्ताव सादर केला होता. नूमुद आलोसे यांनी फिर्यादीस शासनाचे PMEGP या योजने अंतर्गत बॅंके कडून कर्ज व सबसीडी मिळणेसाठीचे प्रकरण PMEGP या साईडवर अपलोड करुन बॅंकेकडे फॉरवर्ड करण्यासाठी व सबसीडी मिळवुन देण्याच्या मोबदल्यात फिर्यादी यांचेकडून १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| ९ | नाशिक परिक्षेत्र, अहमदनगर अ‍ॅ.क. ब्युरो., कोतवाली पोलीस स्टेशन, जि. अहमदनगर गु.र.नं. ५५७/२०२१ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम<br>दिनांक - ०३/०८/२०२१ | १) गणेश जनार्धन देहाडे, वय ४२ वर्षे, ग्रामसेवक, मांडवे ता.जि. अहमदनगर<br>(जिल्हा परिषद)<br>(सीआर/४६५/अहमदनगर/२०२१) | ३ | ५,०००/- रुपये लाचेची मागणी | एमआरईजीएस | फिर्यादी यांच्या वडीलांचे नावे मौजे मांडवे, ता.नगर येथे एम.आर.ई.जी.एस. योजने अंतर्गत मंजूर झालेल्या विहीरीचे अनुदान रु.४२,०००/- मंजुर करणेसाठी पंचायत समिती नगर येथे प्रस्ताव पाठविणे करीता नमुद आलोसे यांनी फिर्यादीकडे ५०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्विकारण्याची संमती दर्शविली म्हणून नमुद आलोसेंविरुध्द वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| १० | ठाणे परिक्षेत्र, ठाणे अ‍ॅ.क.ब्युरो., अंबरनाथ पो. स्टे, गु.र.नं ४२०/२०२१ भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ प्रमाणे.<br>दिनांक - ०९/०७/२०२१ | १) प्रतापसिंह उत्तमसिंह ब्रम्हनाथ, वय-२९ वर्ष,हुद्दा-लिपीक<br>(अन्न व नागरी पुरवठा विभाग)<br>(सीआर/४१३/ठाणे/२०२१) | ३ | १,५००/- रुपये | राजीव गांधी योजना | फिर्यादी हे गरजु लोकांना राजीवगांधी योजनेचा लाभ मिळवुन देण्याकरीता लागणारी कागदपत्रांची प्रोसीजर करुन लोकांना मदत करतात. त्यांचे ओळखीचे ०५ लोकांचे रेशनकार्डची ऑनलाईन नोंद करण्यासाठी यातील आलोसे नं १ यांनी प्रत्येकी २०० रु प्रमाणे १००० रु ची मागणी करुन तडजोडअंती ५०० रु लाचेची रक्कम स्विकारली व यातील आलोसे २ यांनी २ लोकांचे जुने शिधापत्रिका देण्याकरीता प्रत्येकी ५०० रु प्रमाणे एकुण १००० रु लाचेची मागणी करुन स्किारली. |
| ११ | पुणे परिक्षेत्र, पुणे अ‍ॅ.क.ब्युरो, तळेगाव दाभाडे पोलीस ठाणे, पुणे ग्रामीण, गु.र.नं. १२१/२०२१, भ्र. प्रति.अधि क ७<br>दिनांक-२४/०३/२०२१ | १.सत्यजित कृष्णकांत वाढोकर, वय ५८ वर्षे, डॉक्टर, पवना हॉस्पीटल, (खाजगी) सोमाटणे फाटा, ता.वडगाव मावळ जि.पुणे<br>(आरोग्य विभाग)<br>(सीआर/२००/पुणे/२०२१) | खाई | ९,००० रुपये | महात्मा फुले जन आरोग्य योजना | फिर्यादी यांचे वडिलांचे डायलेसीसचे मोफत उपचार महात्मा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत आरोपी क्र. १ यांचे पवना हॉस्पीटल मध्ये सुरु होते. सदरच्या शासकिय योजनेअंतर्गत औषधोपचार हे पुर्णपणे मोफत असताना सुध्दा सदर उपचार करण्यासाठी आरोपी क्र. १ यांनी १०,०००/- रु. लाच मागणी करुन तडजोडीअंती ९०००/- रु. लाच रक्कम आरोपी क्र २ यांचेकरवी स्वीकारली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | औरंगाबाद परिक्षेत्र, जालना अ‍ॅ.क. ब्युरो., पोस्टे तालुका जालना, गुरनं. ३४३/२०२१ कलम ८ भ्र. प्र. अधिनिम १९८८<br>दिनांक - ३१/०७/२०२१ | १. श्री. देविदास भिकाजी ठोके पाटील, वय-५६ वर्ष, व्यवसाय- नौकरी, कनिष्ठ अभियंता, पंचायत समिती, जालना.<br>(पंचायत समिती)<br>(सीआर/४६०/जालना/२०२१) | ३ | १९,०००/- रुपये | जिल्हा परिषद अंतर्गत २५१५ योजना | नमुद आलोसे यांनी फिर्यादी यांना त्यांचे गावाला खासदार फंडातून जिल्हा परिषद अंतर्गत २५१५ योजनेतून गावठाण रस्ता व स्मशानभुमी बांधकामासाठीचे मंजूर झालेली एम बी रक्कम ४,७३,००० रुपयेचा चेक फिर्यादी यांचेकडून घेण्यासाठी फिर्यादी यांना ३ टक्के प्रमाणे १४,००० रुपये व ५,००० रुपये कामाचे ऑडीट करण्यासाठी एकुण १९,००० रुपयांची लाच फिर्यादी यांना देत असतांना पकडले. |
| १३ | ठाणे परिक्षेत्र, ठाणे अ‍ॅ.क.ब्युरो., नौपाडा पोलीस ठाणे गु.नों.क्र. ३००/२०२१ भ्र.प्र.अधि १९८८ चे कलम ७<br>दिनांक - १२/१०/२०२१ | बळीराम तुकाराम कोळेकर, सहाय्यक वन संरक्षक, उप वन संरक्षक, नौपाडा ठाणे<br>(वन विभाग)<br>(सीआर/५९४/ठाणे/२०२१) | १ | ५,३०,०००/- रुपये | जिल्हा वार्षिक योजना | फिर्यादी हे वन परिक्षेत्र अधिकारी (RFO oxZ 2), टोकावडे दक्षिण या पदावर कार्यरत असुन आलोसे यांनी सन २०२०-२१ मध्ये रोपवाटीका संदर्भात फिर्यादी यांना प्राप्त झालेल्या अठरा लाखाच्या निधीमधील पाच टक्के प्रमाणे ९२,०००/- रुपयांच्या लाचेची मागणी केली तसेच फिर्यादी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील जंगलाचे संरक्षण, रोपांची लागवड व इतर कामे याकरिता सन २०२०-२१ व २०२१-२२ या दोन आर्थिक एक कोटी सहा लाख चौवीस हजार रुपयांचा निधी जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत प्राप्त झालेला नसल्याने आलोसे व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेकडे वारंवार मागणी केली असता, यातील आलोसे यांनी फिर्यादी यांना सदर निधी प्राप्त होण्याकरिता पाच टक्के रक्कम ५,३०,०००/- रुपये जिल्हा नियोजन अधिकारी याना दयावे लागतील असे सांगून लाचेच्या मागणीचा तगादा लावला व सदर लाच रक्कम स्विकारली. |
| १४ | नाशिक परिक्षेत्र, जळगांव अ‍ॅ.क.ब्युरो., धरणगांव पो.स्टे.,जि.जळगांव, गुरनं. २७/२०२२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे<br>दिनांक - २४/०१/२०२२ | १) अशोक दामु बिऱ्हाडे, वय ५६, प्रभारी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समीती धरणगांव, जि.जळगांव.<br>२) तुळशिराम भावलाल सैंदाणे, वय ३४, कंत्राटी कर्मचारी समाविशीत शिक्षण तज्ञ, गट साधन केंद्र, पंचायत समीती धरणगांव, जि.जळगांव.<br>(जिल्हा परिषद विभाग)<br>(सीआर/३७/जळगांव/२०२२) | २<br>ईलोसे | २,०००/- रुपये | शिक्षा अधिकर | फिर्यादी यांचे मालकीची नोबल इंटरनॅशनल शाळा शासनाच्या RTE (Right to Education) योजने प्रमाणे २५:विद्यार्थी हे शाळेत भरावयाचे असतात. त्यासाठी शासन प्रत्येक विद्यार्थ्यामागे ८,०००/-रु. वार्षीक अनुदान मंजुर करते. फिर्यादी यांनी सदर शाळेचे वर नमुद अनुदान मंजुर होण्यासाठीचा प्रस्ताव सादर केला असुन सदर प्रकरणामध्ये काही त्रुटया असल्याचे सांगुन त्रुटयांची पुर्तता करुन त्याचा अनुकुल अहवाल पाठविण्याच्या मोबदल्यात आलोसे क्र. १ यांनी फिर्यादीकडे २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन |
| १५ | नागपुर परिक्षेत्र,गोंदिया अ‍ॅ.क. ब्युरो,पोलीस स्टेशन देवरी, जि. गोंदिया अप क्र. ५१/२०२२, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधि. अन्वये.<br>दिनांक - ०३/०३/२०२२ | चंद्रमनी लक्ष्मणराव मोडक, वय ५७ वर्ष, खंड विकास अधिकारी, पंचायत समिती देवरी, जिल्हा गोंदिया,<br>(पंचायत समिती)<br>(सीआर/१०३/गोंदिया/२०२२) | १ | ६५,०००/- रुपये | मनरेगा योजना | फिर्यादी यांना मनरेगा योजनेअंतर्गत पुर्ण केलेल्या कामांची बिले मंजुर करण्याकरीता आणि ग्रामपंचायत भागी/सिरपूर अंतर्गत मौजा भागी येथे १५ व्या वित्त आयोगांतर्गत मंजुर झालेले १०,००,०००/- रुपयांच्या कामाच्या इस्टीमेटवर सही करुन मंजुर करण्याकरीता आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे एकुण रू. ७०,०००/- रुपये मागणी करुन तडजोडीअंती ६५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली. |
| १६ | पुणे परिक्षेत्र, सोलापुर अ‍ॅ.क.ब्युरो., कुर्डुवाडी पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण गु.र.नं. २६१/२०२२, भ्र. प्रति.अधि क ७<br>दिनांक - ०२/०६/२०२२ | संदिप रामदास गावडे, वय ४५ वर्षे, कृषी विस्तार अधिकारी, नेमणुक कृषी विभाग, पंचायत समिती कार्यालय, कुर्डुवाडी ता. माढा जि. पुणे<br>(जिल्हा परिषद)<br>(सीआर/३०४/सोलापुर/२०२२) | ३ | ५००/- रुपये | जिल्हा परिषद सेस अंतर्गत डीबीटी योजना | फिर्यादी यांनी त्यांचे वडिलांचे नावे जिल्हा परिषद सेस अंतर्गत डिबीटी योजनेअंतर्गत कडबा कुटटी मशीन अनुदान मिळणेकरिता अर्ज केला असुन सदर अर्जामध्ये बॅक अकांउट नंबर चुकला असल्याचे सांगुन आलोसे यांनी सदर अकाउंट नंबर दुरुस्त करण्याकरिता फिर्यादी यांचेकडे १,०००/- रु लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ५००/- रु लाच स्विकारले. |
| १७ | नांदेड परिक्षेत्र, लातुर अ‍ॅ.क.ब्युरो., पो. स्टे.चाकुर, लातूर, गुरनं ३४६/२०२२ क. ७, ७ अ भ्र.प्र.अ. सन १९८८<br>दिनांक - ०३/१०/२०२२ | १आनंद मोहनराव कांबळे, वय ३६ वर्षे, पद - फिल्ड सुपरवायझर, टॅलेंट प्रो. पिपल्स रिसर्च सोल्युशन्स, तालुका प्रतिनिधी, अ‍ॅग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी लिमीटेड, ता.चाकुर जि.लातूर<br>२.संदीप जालिंदर बानाटे, वय २८ वर्षे, पद-फिल्ड सुपरवायझर, टॅलेंट प्रो. पिपल्स रिसर्च सोल्युशन्स, तालुका प्रतिनिधी, अ‍ॅग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी लिमीटेड,ता. चाकुर, जि.लातूर<br>(इतर विभाग)<br>(सीआर/५६६/लातुर/२०२२) | ईलोसे<br>ईलोसे | ३,५००/- रुपये | प्रधान मंत्री पीक विमा योजना | फिर्यादी यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणीसाठी कार्यरत असलेल्या अ‍ॅग्रीकल्चर इन्शुरन्स कंपनी लिमीटेडच्या वतीने काम पाहणारे आलोसे क्र. १ व २ यांनी फिर्यादी यांचे शेतात जास्तीचे नुकसान झाले बाबत केलेल्या पंचनाम्याचा मोबदला म्हणुन तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत फिर्यादी यांना आर्थिक लाभ मिळवुन देण्याकरिता दोन्ही आलोसे यांनी ३,५००/- रुपये लाचेची मागणी आलोसे क्र.२ यांनी स्विकारली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १८ | नागपुर परिक्षेत्र, चंदुप्रर ॲ.क.ब्युरो., पो.स्टे. रामनगर अपराध क्रमांक ११९५/२०२२ कलम ७ भ्र. प्र. अधि. सन १९८८ (सुधारित सन २०१८) दिनांक - ०१/११/२०२२ | अनिल जगन्नाथ शिंदे, वय २७ वर्ष, व्यवसाय - नोकरी, कनिष्ठ अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, जिवती ता. जिवती जि. चंद्रपूर (सार्वजनिक बांधकाम विभाग) (सीआर/६१७/चंद्रपुर/२०२२) | २ | २,००,००० /- रुपये | आर.सी.एल. डबलु.ई. योजना | फिर्यादी यांनी मागील वर्षी सप्टेंबर/आक्टोबर महिण्यामध्ये आर.सि.एल.डब्ल्यू.ई. या केंद्र सरकारच्या योजने अंतर्गत मुंगसाजी कन्स्ट्रक्शन कंपनी यवतमाळ तर्फे चंद्रपूर जिल्हयातील जिवती तालूका येथील पुल बांधणीचे कामे पुर्ण केलेल्या कामाचे निरीक्षण आलोसे यांचेकडून करण्यात आलेले होते. फिर्यादी यांनी केलेल्या संपुर्ण कामाचे अंदाजे १ कोटी रुपयाचे एकूण ४ बिले असून सदर ४ बिलापैकी २ बिलं तयार करुन मंजूर करणेकामी सार्वजनिक बांधकाम विभाग, चंद्रपूर येथे पाठविणेकरीता तसेच बिल मंजूर झाल्यानंतर उर्वरित २ बिलं तयार करुन मंजूरीकरीता पाठविण्याच्या कामाकरीता आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे २,००,०००/- रु. लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| १९ | नाशिक परिक्षेत्र, धुळे ॲ.क.ब्युरो., मोहाडी पोलीस स्टेशन,जि.धुळे, गुरनं. १५/२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७ प्रमाणे दिनांक - २७/०१/२०२३ | सुनिल रामदास सुर्यवशी, वय-३७ वर्षे, डेटा ऑपरेटर, तालुका कृषी कार्यालय, धुळे (कृषी विभाग) (सीआर/४९/धुळे/२०२३) | ईलोसे | ३००/- रुपये | पी.एम. किसान योजना | फिर्यादी यांच्या आई हयात असतांना त्यांचे नावे असलेल्या शेतजमीनी मध्ये पीएम किसान योजनेचा लाभ मिळत होता त्यांची आई सन २०१९ मध्ये मयत झाल्याने त्यांना सदरचा लाभ मिळणे बंद झाल्याने सदर शेत जमीनीवर पी एम किसान योजनेचा लाभ मिळण्यासाठी फिर्यादी यांनी ऑनलाईन अर्ज केला असुन सदर पी एम किसान योजनेच्या ऑनलाईन अर्जाचे पडताळणी करुन काम करुन देण्यासाठी आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे ३००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली. |
| २० | नागपुर परिक्षेत्र, वर्धा ॲ.क.ब्युरो., पो. स्टे. वर्धा शहर, जि. वर्धा, अप.क्र. १९६/२०२३ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ दिनांक - १७/०२/२०२३ | १) विजय कृष्णराव सहारे, वय ५० वर्ष, पद- उप जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, वर्धा<br>२) त्रृषिकेश रमेशराव ढोडरे, वय ४३ वर्ष, व्यवसाय - शेती व राशन दुकान, जामणी (महसुल विभाग) (सीआर/१०७/वर्धा/२०२३) | १<br>खाई | २०,०००/- रुपये | पी.एम.गरीब कल्याण योजना | आलोसे यांनी पंतप्रधान गरीब कल्याण योजनेतुन फिर्यादीस मिळणारे कमीशन काढुन दिल्याचे २५,०००/- रु. आणि फिर्यादीचे दोन्ही राशन दुकानाचे सात महिन्यांच्या हफ्त्याचे २५,०००/- रु. असे एकुण ५०,०००/- रु. ची लाचेची मागणी आरोपी क्र.२ याचे मार्फतीने करुन तडजोडअंती ४०,०००/- रु. स्विकारण्याची तयारी दर्शविली असता यातील आरोपी क्र. २ यांनी पहिला हप्ता २०,०००/- रु. लाच रक्कम स्वत: स्विकारले. तसेच घटनास्थळावरुन ५,६०,३६०/- रु. वेगवेगळया पाकीटात मिळुन आले. |
| २१ | अमरावती परिक्षेत्र, यवतमाळ ॲ.क. ब्युरो., पो.स्टे.आर्णी जि. यवतमाळ,अप.क्र.११४/२०२३, कलम ७, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ दिनांक - ०३/०३/२०२३ | १) स्नेहल राजेंद्र देशमुख, वय ३४ वर्ष, पद पुरवठा निरीक्षण अधिकारी नेमणुक पुरवठा विभाग तहसिल कार्यालय आर्णी ता आर्णी जिल्हा यवतमाळ<br>२) दर्शन अनिल जगताप, वय २७ वर्ष, व्यवसाय डाटा एंट्री ऑपरेटर, बाजारभाव संकलन केंद्र, आर्णी<br>३) प्रदिप बाबाराव भगत, वय ४५ वर्ष, व्यवसाय शासकीय रास्त धान्य दुकानदार ग्राम मनपुर (अन्न व नागरी पुरवठा विभाग) (सीआर/१४६/यवतमाळ/२०२३) | २<br>खाई<br>खाई | ५,०००/- रुपये | पी.एम.गरीब कल्याण योजना | फिर्यादी यांना त्यांचे सन २०२२ मध्ये तळणी येथील रास्त दुकानामार्फत शिधापत्रिका धारकांना प्रधानमंत्री गरिब कल्याण योजने अंतर्गत वाटप करण्यात आलेल्या मोफत धान्याचे बिलामधील डिलर कमिशन जमा करुन दिल्याबद्दल केलेल्या कामाचा मोबदला म्हणुन तसेच भविष्यात कोणताही त्रास न देण्याकरिता तडजोडीअंती ५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारली तसेच आरोपी क्र.२ व ३ रास्त लाच रक्कम देण्यास सांगुन प्रोत्साहन दिले. |
| २२ | नागपुर परिक्षेत्र, गोंदिया ॲ.क.ब्युरो., पो.स्टे. रामनगर, जि. गोंदिया १०१/२०२३ कलम ७, ७ अ, १२ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ दिनांक - २१/०४/२०२३ | १. प्रिती पशन साखरे, वय ३६ वर्ष, पद - ग्रामसेवक, ग्राम पंचायत सेजगांव खुर्द व हिवरा<br>२. अर्चना योगेश्वर कन्सरे, वय २८ वर्ष, पद सरपंच, ग्राम पंचायत सेजगांव खुर्द रा. कोहका पोष्ट रतनारा ता. जि. गोंदिया<br>३) योगेश्वर भैय्यालाल कन्सरे, वय ३६ वर्ष, (सरपंच यांचे पती) (पंचायत समिती) (सीआर/२७४/गोंदिया/२०२३) | ३<br>ईलोसे<br>खाई | ३५,०००/- रुपये | जनसुविधा योजना | फिर्यादी हे बांधकाम मटेरियल सप्लायर असुन त्यांनी गट ग्रामपंचायत सेजगाव खुर्द अंतर्गत प्राप्त टेंडर नुसार जनसुविधा योजने अंतर्गत सेजगाव स्मशानभुमी कडे जाणाऱ्या रस्त्याचा बांधकामाकरीता लागणारे २,७१,८५७/- रुपयाचे साहित्य पुरवठा केलेल्या बांधकाम साहित्याची बिले मंजुर करुन त्यांना २,७१,८५७/- रुपयाचा धनादेश दिल्याचा मोबदला म्हणुन आलोसे क्र.१ यांनी १३,०००/- रु. व आलोसे क्र.२ व आरोपी क्र. ३ यांनी २२,०००/- रु. लाचेची मागणी करुन आलोसे क्र.१ व २ यांनी एकुण ३५,०००/- रुपये आरोपी क्र.३ यांनी स्विकारले. |
| २३ | नांदेड परिक्षेत्र, लातुर ॲ.क.ब्युरो., पो. स्टे.चाकुर जि.लातूर गुरन २४४/२०२३ क. ७ भ्र.प्र.अ.१९८८ दिनांक - २०/०६/२०२३ | परशुराम पंढरी गायकवाड, वय ५० वर्ष, पद - ग्रामसेवक, ने. पंचायत समिती, चाकुर, ग्रामपंचायत बोथी ता. चाकुर जि. लातुर (जिल्हा परिषद) (सीआर/४१५/लातुर/२०२३) | ३ | ३,०००/- रुपये | मनरेगा योजना | फिर्यादी यांना, त्यांचा एमजीनरेगा अंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीरीचा प्रस्ताव पंचायत समिती चाकुर येथे दाखल केल्याचा मोबदला तसेच यापुढे सिंचन विहीर मंजुर होण्यासाठीच्या कामात मदत करण्यासाठी म्हणुन आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे ३,०००/- रु लाचेची मागणी करुन स्विकारली म्हणून गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ | नागपुर परिक्षेत्र, गोंदिया ॲ.क.ब्युरो., पो.स्टे.डुग्गीपार अ.क्र. २८२/०२३ कलम ७ भ्र.प्र.अधि.१९८८<br>दिनांक - १९/०८/२०२३ | १. श्रीमती रीना हेमंत तरोणे,वय ३२ वर्ष रा. वडेगाव ता, सडक/अर्जुनी जि. गोंदिया, सरपंच ग्रामपंचायत वडेगाव | ईलोसे | ७०,०००/- रुपये लाचेची मागणी | राष्ट्रीय ग्रामिण योजणा | फिर्यादी हे बांधकाम साहित्य पुरवठा धारक असुन त्यांनी राष्ट्रीय ग्रामिण योजण अंतर्गत ग्राम.प. वडेगाव येथे सन २०२० -२०२१ मध्ये ग्रा.प.निविदेनुसार विविध कामा करिता बांधकाम साहित्य पुरवठा केला असुन पुरवठा साहित्याचे मंजुर बिलाचे चेक देणेकरिता आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे १५,५५,६९६/- रुपये रक्कमेवर ५ टक्के प्रमाणे ७५,०००/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ७०,०००/- लाच रक्कम मागणी केली. |
| | | २. दिनेश सुनिल मुनिश्वर वय २७ वर्ष, उपसरपंच ग्रामपंचायत वडेगाव | ईलोसे | | | |
| | | ३. मार्तंड मंसाराम मेंढे, वय ३७ वर्ष, ग्रामपंचायत सदस्य वडेगाव, ता, सडक/अर्जुनी जि.गोंदिया | ईलोसे | | | |
| | | ४. श्रीमती लोपा विजय गजभिये वय ५० वर्ष, ग्रामपंचायत सदस्य वडेगाव<br>(पंचायत समिती)<br>(सीआर/५४४/गोंदिया/२०२३) | ईलोसे | | | |
| २५ | नाशिक परिक्षेत्र, नाशिक ॲ.क. ब्युरा,येवला तालुका पोलीस स्टेशन, नाशिक ग्रामीण. गुरनं.४९०/२०२३ भ्र.प्र.का.सन १९८८ चे कलम ७, ७ अ प्रमाणे<br>दिनांक - ०७/०९/२०२३ | १.पांडुरंग हांडु कोळी, वय ५७, मंडळ अधिकारी, मौजे सावरगांव, ता.येवला, जि. नाशिक, | ३ | ९,०००/- रुपये | लक्ष्मी मुक्ती | फिर्यादी यांचे आईचे नाव लक्ष्मी मुक्ती या शासकीय योजने अंतर्गत वडिलांचे नावे असलेल्या जमीनीच्या सातबारा उतान्यावर नाव लावण्यासाठी आलोसे क्र. १. यांनी फिर्यादी यांचे कडे १५,०००/-रु.लाचेची मागणी केली व तडजोडअंती ९,०००/-रु.लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आलोसे क्र.१ यांचे सांगणेवरुन आरोपी क्र. २ यांनी स्विकारली. |
| | | २. विठोबा जयराम शिरसाठ, वय ३२ ,खाजगी इसम, रा.ठाणगाव ता.येवला जि. नाशिक<br>(महसुल विभाग)<br>(सीआर/५९६/नाशिक/२०२३) | खाई | | | |
| २६ | नाशिक परिक्षेत्र, नाशिक ॲ.क. ब्युरो,मुबंईनाका पो.स्टे. नाशिक शहर गुरनं ३७५ /२०२३ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम कलम ७ प्रमाणे<br>दिनांक - १७/०९/२०२३ | ज्ञानेश्वर पंढरीनाथ विसपुते वय ५७ वर्ष, उप विभागीय अभियंता, जिल्हा परीषद बांधकाम उप विभाग, चाळीसगांव ता. चाळीसगांव जि. जळगांव<br>(जिल्हा परिषद)<br>(सीआर/६१८/नाशिक/२०२३) | १ | ४,००,००० /- रुपये | डॉक्टर शामा प्रसाद मुखर्जी रुरबन योजना | फिर्यादी यांचे आलोसे यांनी त्यांच्या कार्यकाळात ''डॉक्टर शामा प्रसाद मुखर्जी रुरबन'' या शासकिय योजने अंतर्गत पातोंडा ता. चाळीसगांव जि. जळगांव येथे समुह परिसरात क्लस्टर विकसीत करण्याचे कामांचे परिवेक्षण करुन पुर्णत्वाचा दाखला देवुन बिलाची रक्कम ४ कोटी ८२ लाख रुपये फिर्यादी यांना मिळाली म्हणुन त्याचे मोबदल्यात बक्षीस म्हणुन तसेच फिर्यादी यांची जमा असलेली ३५ लाख रुपये अनामत रक्कम फिर्यादी यांना परत मिळवुन देण्यासाठी पुर्णत्वाचा दाखला देणेकरीता फिर्यादी यांचेकडे एकुण बिलाचे १ टक्के म्हणुन ५,००,०००/- रुपयाची लाचेची मागणी करुन तडजोडअंती ४,००,०००/- रुपयांची लाचेची रक्कम स्विकारली. |
| २७ | नाशिक परिक्षेत्र, जळगांव ॲ.क.ब्युरो. , यावल पोस्टे गुरनं. ४६/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे<br>दिनांक - १७/०२/२०२४ | १. हेमंत कमलाकर जोशी वय ४८, ग्रामसेवक ग्रामपंचायत चुंचाळे, ता.यावल जि.जळगांव | ३ | १,००,००० /- रुपये | कौशल्य विकास योजना | फिर्यादी हे अध्यक्ष असलेल्या म.नबाब उघडू तडवी गुरुजी फाऊंडेशन मार्फत ग्रामपंचायत चुंचाळे यांनी कौशल्य विकास योजने अंतर्गत शिलाई मशिन, कटींग व शिलाई प्रशिक्षण हे १ जानेवारी २०२४ ते १५ जानेवारी २०२४ या कालावधीत चुंचाळे गावी राबविले होते. सदर प्रशिक्षणाचे मंजुर झालेले २,००,०००/- रुपये फाउंडेशनच्या खातेवर जमा करणेसाठी फिर्यादी हे आलोसे याना भेटले असता त्यांनी केलेल्या कामाचे बक्षीस म्हणुन २,००,०००/- चे ५० टक्के म्हणजे १,००,०००/- रुपयाची दयावे लागतील, व पैसे नाही दिले तर संस्थेला यापुढे ग्रामपंचायतचे काम देणार नाही असे सागुन लाचेची मागणी करुन इलोसे क्र.२ यांनी सदर लाच रक्कम स्विकारली. |
| | | २. सुधाकर धुडकु कोळी वय ३५, कंत्राटी सेवक ग्रामपंचायत चुंचाळे रा. चंदुअण्णा नगर/शिवम नगर, निमखेडी शिवार, जळगांव.<br>(जिल्हा परिषद)<br>(सीआर/८८/जळगांव/२०२४) | ईलोसे | | | |
| २८ | छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, जालना ॲ.क.ब्युरो,पोस्टे कदिम जालना, गुरनं. ४५६/२०२४ कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८<br>दिनांक - ०९/११/२०२४ | १. समाधान धोंडिबा लोखंडे, वय-३० वर्षे, खाजगी फिटर, इकोझोन सोल्युशन प्रा.लिमिटेड, जि. जालना | खाई | १,०००/- रुपये | कुसुम योजना | फिर्यादी यांनी शासनाचे कुसूम योजनेंतर्गत सोलार पॅनल मिळणेसाठी ऑनलाईन अर्ज केला होता सदर अर्जाचे अनुषंगाने सोलार पॅनल बसविण्याच्या जागेचा सर्व्हे करून देण्यासाठी आरोपी क्र. यांनी लाइनमॅनला पैसे द्यावे लागतील असे म्हणून १,०००/- रुपये लाचेची मागणी करून आरोपी क्र.२ यांनी लाच रक्कम स्विकारली. |
| | | २. कौसर नसीर शेख, वय-३० वर्षे, मजूरी, रा. दहेगाव, ता. जाफ्राबाद, जि. जालना<br>(म.रा.वि.वि.कं.मर्या.)<br>(सीआर/५९९/जालना/२०२४) | खाई | | | |
| २९ | नागपुर परिक्षेत्र, नागपुर ॲ.क.ब्युरो., बुट्टीबोरी, नागपूर ग्रामीण अप. क्र. ७७७/२०२४ कलम ७ भ्र.प्र.का.<br>दिनांक - २७/११/२०२४ | अतुल श्यामसूंदर चिव्हाणे, वय ४२ वर्ष ,पद - कंत्राटी तांत्रिक कृषी सहाय्यक, पंचायत समिती, नागपूर (कंत्राटी)<br>(कृषी विभाग)<br>(सीआर/६२१/नागपुर/२०२४) | ईलोसे | ५,०००/- रुपये | मनरेगा योजना | फिर्यादी यांनी त्यांच्या शेतात मोहगणी वृषाची लागवड केली होती. मनरेगा या योजनेअंतर्गत ८,६३,१२८/- मंजूर झाले होते त्यापैकी अंदाजे ४,००,०००/- रुपये फिर्यादी व नातेईकाच्या खात्यात जमा झाले होते. त्या कामाचा मोबदला तसेच उर्वरित कामाचे बिल मंजूर करनेकामी आलोसे यांनी फिर्यादी यांचेकडे १०,०००/- रुपये मागणी करून स्वत: करिता ५,०००/- रुपये लाच रक्कम स्विकारली. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | नाशिक परिक्षेत्र, नाशिक अॅ.क.ब्युरो., हरसुल पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर २६३/२०२४, भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे<br>दिनांक - ०९/१२/२०२४ | प्रविण जगन्नाथ सुर्यवंशी, वय ४३ वर्षे, वरिष्ठ तंत्रज्ञ, ठाणापाडा सेक्शन म.रा.वि.वि.कपंनी मर्यादित ता.०यंबकेश्वर जि. नाशिक<br>(म.रा.वि.वि.कं.मर्या.)<br>(सीआर/६३७/नाशिक/२०२४) | ४ | १,०००/- रुपये | कुसुम योजना | फिर्यादी यांचे वडिलांचे नावे गट नं.२५८ क्षेत्र ०.५७ आर शेती मध्ये शासनाची महाकृषी उर्जा अभियान- पीएम कुसूम योजना अंतर्गत शेतासाठी ३ एचपी सोलर सर्व्हे करून महावितरण लाईनमन अॅपवर वरिष्ठ कार्यालयात रिपोर्ट पाठविल्याचे मोबदल्यात बक्षिस स्वरूपात आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडे १,५००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडअंती १,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारली. |
| ३१ | पुणे परिक्षेत्र, कोल्हापुर अॅ.क.ब्युरो., हातकणंगले पो.स्टे ,पुणे शहर, गुन्हा रजि नं .१८/२०२५ भ्र.प्र.अधि. कलम ७-अ,१२ प्रमाणे<br>दिनांक - १०/०१/२०२५ | १. सुभाष मधुकर घुणके, वय ३४ वर्षे, पद कॉम्प्युटर ऑपरेटर(खाजगी इसम ), पुरवठा कार्यालय हातकणंगले जि. कोल्हापुर | खाई | २,५००/- रुपये | राष्ट्रीय अन्न संरक्षण अधिनियम २०१३ अंतर्गत प्राधान्य कुटुंब योजना | फिर्यादी यांनी शासनाच्या राष्ट्रीय अन्न संरक्षण अधिनियम २०१३ अंत्रर्गत प्राधान्य कुटुंब योजनेचा अन्नधान्य लाभ मिळावा म्हणुन अर्ज केला असुन सदर अर्जामध्ये अर्जदार यांच्या कुटुंबातील लोकांची नावे समाविष्ट केल्याचे काम पुर्ण केल्यामुळे त्याचा मोबदला म्हणुन आरोपी क्र.१ याने फिर्यादी यांचेकडे स्वत:साठी व पुरवठा विभागातील अधिकारी यांचेसाठी ४,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती २,५००/- रूपये लाच मागणी करून आरोपी क्र.२ यांनी आरोपी क्र. |
| | | २. शैंलेंद्र महादेव डोईफोडे, वय २२ वर्षे, (खाजगी इसम )<br>(महसुल विभाग)<br>(सीआर/२३/कोल्हापुर/२०२५) | खाई | | | |
| ३२ | नाशिक परिक्षेत्र, जळगांव अॅ.क.ब्युरो., भुसावळ तालुका पो.स्टे. गुरनं. १८/२०२५ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे.<br>दिनांक - २२/०१/२०२५ | प्रशांत प्रभाकर इंगळे,वय ४५, उपकार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.लि. चोरवड कक्ष ता.भुसावळ,जि.जळगाव<br>(म.रा.वि.वि.कं.मर्या.)<br>(सीआर/४७/जळगांव/२०२५) | २ | २०,०००/- रुपये | एनएससी स्किम अंतर्गत ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ | फिर्यादी यांचे व्यवसायीक मित्र श्री.सुनिल रामकृष्ण अग्रवाल, यांचा कुन्हा ता.भुसावळ येथील महालक्ष्मी स्टोन क्रेशरचे व्यवसायासाठी NSC स्किम अंतर्गत ट्रान्सफॉर्मरची क्षमतावाढ १०० के.व्ही.वरुन २०० के.व्ही. करण्यासाठीचे प्रकरणावर सही करुन ते वरिष्ठ कार्यालयात पाठवण्याचे मोबदल्यात आलोसे यांनी फिर्यादी यांचे कडे प्रथम २५,०००/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडअंती २०,०००/-रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली. |
| ३३ | छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र,धाराशिव अॅ.क.ब्युरो,पोस्टे तुळजापुर, गुरनं. ३३/२०२५ कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८<br>दिनांक - २९/०१/२०२५ | अतुल शहाजी देशमुख, वय- ३७ वर्षे, लिपीक (कंत्राटी), ने. तालुका कृषी अधिकारी कार्यालय तुळजापुर, जि. धाराशिव<br>(कृषी विभाग)<br>(सीआर/६३/धाराशिव/२०२५) | ३ | ३००/- रुपये | मनरेगा योजना | फिर्यादी यांचे मुलाचे नावे शेतातील तुती रेशीम लागवडीचा प्रस्तावास तालुका कृषी अधिकारी यांचेकडून प्रशासकीय मान्यता मिळाली होती. फिर्यादी यांचे तुती रेशीम लागवडीचे ०४ मस्टरचे २७,६२१ रुपयांचे बील मंजुर झाले होते, परंतु फिर्यादी यांना मिळालेले नाही. नमुना क्र. ०४ वरुन मागील आठवडयांचे म.न.रे.गा.चे ऑनलाइन मस्टर काढण्यासाठी आरोपीने फिर्यादी यांचेकडे ३०० रुपये लाच रकमेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली. |
| ३४ | अमरावती परिक्षेत्र, बुलढाणा अॅ.क. ब्युरो,पो.स्टे.चिखली अप.नं. ४००/२०२५ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८<br>दिनांक - २७/०५/२०२५ | हेमंतसिंह जितेंद्रसिंह राजपुत, वय ३४ वर्ष, पद-कनिष्ठ सहायक, पंचायत समिती चिखली,<br>(पंचायत समिती)<br>(सीआर/३०४/बुलढाणा/२०२५) | ३ | २,५००/- रुपये | थेट लाभ हस्तांतरण | फिर्यादी यांनी थेट लाभ हस्तांतरण योजनेअंतर्गत शिलाई मशीन मिळणेकरीता पंचायत समिती कार्यालय चिखली येथे अर्ज केला होता. फिर्यादी यांचा अर्ज मंजुर होवुन अनुदानासाठी पात्र ठरल्याने शिलाई मशीन खरेदी केल्याबाबतचे १२,०००/-रू. चे बिल जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग बुलढाणा येथे पाठविण्याचा मोबदला म्हणुन आलोसे यांनी फिर्यादी योचकडे २,५००/-रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारली. |